# बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या एन.सी.सी. छात्रांची यशस्वी भरारी





**पाथर्डी शहर (दै.युवा ध्येय)** पाथर्डी येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेमधील छात्रांची भारतीय सेनादलामध्ये निवड झाली असून यामध्ये ज्युनिअर अंडर ऑफिसर विष्णू उगलमुगले, महेश लोकरे, सार्जेंट विष्णू कुत्तरवडे, ऋषिकेश कारखेले, कॅडेट अक्षय कुटे, कॅडेट शशिकांत गर्जे, कॅडेट सौरभ लवांडे, कॅडेट गंगाधर महाजन, कॅडेट जनार्धन कराड, कॅडेट नितीन डांगे यांचा समावेश आहे. या सर्वच छात्रांनी अतिशय धैर्य व चिकाटीने यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे सर्व छात्र हे अतिशय गरीब व शेतकरी कुटुंबातील असून त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे. हे सर्व छात्र थोड्याच दिवसात लष्करात दाखल होऊन देशसेवा करणार आहेत. देशसेवेच्या आपल्या स्वप्न पुर्तीने सर्वच छात्र आनंदित झाले आहेत. या सर्व यशस्वी छात्रांना कमांडिंग ऑफिसर कर्नल जीवन झेंडे, एडम ऑफिसर कर्नल विनय बाली, सुभेदार मेजर लेफ्टनंट व्यंकटेश, कॅप्टन डॉ. अजयकुमार पालवे यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व राष्ट्रीय छात्र सेनेमधील छात्रांचे पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड, उपाध्यक्ष ॲड. सुरेशराव आव्हाड, प्राचार्य डॉ. जी.पी. ढाकणे यांनी अभिनंदन केले.